Vol 6 Issue 11 August 2017

ISSN No : 2249-894X

*Monthly Multidisciplinary Research Journal*

# *Review Of Research Journal*

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies,
Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

*Advisory Board*

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Awadhesh Kumar Shirotriya

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.oldror.lbp.world**

ISSN: 2249-894X Impact Factor : 5.2331(UIF) Volume - 6 | Issue - 11 | august - 2017

Review Of Research

# कोल्हापूर संस्थानातील ख्रिश्चन मिशनऱ्यांचे शेतीविषयक धोरण



प्रा.संदीप नलवडे[1] आणि डॉ. ए. के. मंजुळकर[2]
[1]इतिहास विभाग, महावीर महाविद्यालय, कोल्हापूर.
(बी.एम.रोटे ज्युनिअर कॉलेज)
[2]इतिहास विभागप्रमुख, समाजभूषण गणपतराव काळभोर महाविद्यालय, लोणी काळभोर, पुणे.

### प्रस्तावना :

भारतासारख्या शेतीप्रधान अर्थव्यवस्थेत शेती, तिचा विकास, तिचे आधुनिकीकरण हा विषय अत्यंत महत्त्वाचा ठरतो. प्राचीन व मध्ययुगीन काळातही शेती हाच आपल्या भारतीयांच्या उदरनिर्वाहाचे व व्यापाराचे साधन होते. आधुनिक काळातही हे चित्र एकदम पालटले नाही. कारण शेतीमुळेच अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. परंतु शेती सुधारणेशिवाय आपल्याला तरणोपाय नाही. भारतीय शेती परंपरागत पद्धतीनुसार केली जात होती. ती पावसाच्या लहरीवरच अवलंबून होती. अशा काळात कोल्हापूर संस्थानातील ख्रिश्चन मिशनऱ्यांना भारतीय शेतकऱ्यांची दैनिय अवस्था पहावयास मिळाली. यातून त्यांनी काही प्रमाणात कोल्हापूर संस्थानातील शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून त्यांच्या राहणीमानात बदल धडवून आणण्याचा प्रयत्न केला.

सामान्य माणसामध्ये जागृती निर्माण करणे, त्यांचे राहणीमान सुधारणे, त्यांची गरिबी कमी करणे, त्याला विविध उद्योग, व्यवसाय उपलब्ध करून देणे असे अनेक हेतू मिशनऱ्यांच्या आर्थिक प्रयत्नामागे होते. गरीब, दीनदुबळ्या जनतेचा विकास होणे आवश्यक आहे. त्यासाठी मिशनऱ्यांनी शेतीसंशोधन, शेती व्यवसायात विविध प्रयोग, शेतीला जोड व्यवसाय या सर्व बाबींवर अधिक भर दिला. प्रस्तुत लेखात कोल्हापूर संस्थानातील मिशनऱ्यांचे शेतीविषयक धोरणाचा आढावा धेतला असून निश्चितच शेतकऱ्यांच्या जीवनमानात बदल धडून आला. हे काही अंशी सत्य मानावे लागेल.

### मिशनऱ्यांचे शेतीबाबत मार्गदर्शन

भारत हा कृषिप्रधान देश आहे. याची ब्रिटीशांना चांगल्या प्रकारची जाणीव होती. भारतातील शेतीचा प्रश्न शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असल्याचे मिशनऱ्यांच्या लिखाणातून स्पष्ट झाले आहे. येथील शेती पावसावर अवलंबून असल्याने अनेकवेळा दुष्काळाला सामोरे जावे लागत असे. त्यामुळे शेतकऱ्यांना सावकारांच्या दारात कर्जासाठी जावे लागत असत. सावकाराचे व्याजाचे प्रमाण अधिक असल्याने शेतकऱ्यांस कर्जाची रक्कम फेड करणे कठीण होत असे. त्यामुळे शेतकरी आपली जमीन सावकाराच्या ताब्यात देत असत. दुष्काळ म्हणजे मिशनऱ्यांना चांगली संधी अशा प्रकारची मते आढळून येतात. प्रत्यक्षात मात्र दुष्काळ पिढीतांना मदत करण्यात मिशनऱ्यांचा वाटा अत्यंत महत्त्वाचा समजला जातो. आपल्या मिशन केंद्राच्या परिसरात दुष्काळ ग्रस्तांना अन्नाचे वाटप मिशनरी नियमितपणे करीत असत. यामध्ये त्यांचा स्वार्थ होता असे म्हणता येणार नाही; कारण दुष्काळ पिडीतांचे धर्मांतराचे प्रमाण पाहिले तर ते फार अधिक आहे असे दिसत नाही.

मिशनऱ्यांनी शेतीच्या संदर्भात शेतकरी वर्गांना आधुनिक पध्दतीने शेती करण्यास प्रोत्साहीत केले. श्रीमती फेरार यांनी १८३८ साली अहमदनगर मुक्कामी असताना शेतकऱ्यांना शेती कशी करावी याचे मिशनऱ्यांना मार्गदर्शन केले. यातून संपूर्ण महाराष्ट्रातून मिशनऱ्यांनी वेगवेगळ्या भागात जाऊन शेती प्रगत स्वरूपात करणे किती महत्त्वाचे आहे याची माहिती दिली.

### बटाट्याची लागवड

वायल्डर यांच्यावर श्रीमती फेरार यांचा मोठा प्रभाव पडला होता. त्यांच्या प्रेरणेमुळे त्यांनी कोल्हापूर भागात शिक्षण प्रसाराकडे अधिक लक्ष दिले. श्रीमती फेरार यांच्या शेती विषयक मार्गदर्शनामुळे शेतकऱ्यांना प्रोत्साहित करण्यात बरीच मदत झाली असे म्हणता येईल. त्यांच्या मार्गदर्शनामुळे बटाट्याची लागवड कशा रितीने करावी यांची माहिती दिली आहे.[१] पिकासाठी जमीन कशी पाहिजे, जमीनीची मशागत कशी करावी याची माहिती दिली आहे. त्याचप्रमाणे बटाट्याची लागवड कशा पध्दतीने करावी, पाणी पुरवठा कशा पध्दतीने करावा बटाटाचे पीक कसे तयार झाले हे समजावे यांची सविस्तर माहिती दिली आहे. याबाबत फेरार म्हणतात दुष्काळग्रस्तांना उदर निर्वाहासाठी बटाटा हे महत्वाचे अन्न होऊ शकते. विशेष म्हणजे वायल्डर यांनीही कोल्हापूर भागात शेतकऱ्यांना बटाटा पिकाची माहिती नित्यनियमाने देत असत.

### ऊसाची लागवड

कोल्हापूर संस्थानात ऊसाचे क्षेत्र बरेच असल्याने ऊस पीकाबाबतही श्रीमती फेरार यांनी मौलिक मार्गदर्शन केले आहे.[२] वायल्डर हे आपल्या फिरतीच्या वेळी कोल्हापूर भागातील शेतकऱ्यांना ऊस लागवडीबाबत सतत मार्गदर्शन करीत असत. याबाबत ते नेहमी देशी ऊसापेक्षा विलायती ऊस लावण्याकडे शेतकऱ्यांना प्रवृत्त करत असत. तसेच ऊस लागवडीसाठी जमीन कशी असावी याची माहिती ते देत असत. त्यामुळे

शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही आणि त्यांना चांगले उत्पन्न मिळेल असे त्यांनी स्पष्ट केले आहे. याबाबत त्यांनी स्पष्ट केले होते की, ऊस लागवड करण्यापूर्वी जमिनीची नांगरणी चांगली करणे आवश्यक असते. त्याप्रमाणे ऊस लागण करण्यासाठी दीड फूटाचे ऊसाचे तुकडे उपयुक्त ठरतील असे त्यांनी स्पष्ट केले होते. ऊसाचे एकदा पीक घेतल्यानंतर त्यामध्ये परत नवीन लागण न करता ऊसाच्या खोडव्याच्या मदतीने परत दुसऱ्यांदा आणि तिसऱ्यांदाही घेता येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शिवाय ऊस लागणीच्यावेळी भाजी किंवा इतर पिके घेता येत असल्याने त्यांचेही उत्पन्न शेतकऱ्यांना मिळते असेही त्यांनी स्पष्ट केले होते.

### साखर निर्मिती

श्रीमती फेरार यांनी आपल्या अभ्यासपूर्वक कार्यातून साखर तयार करण्याची पध्दत देखील नमूद केली आहे.[३] साखर तयार करण्याची पध्दत थोडी पारंपारीक स्वरुपाची असल्याचे दिसून येते. या साखरेचा उपयोग शेतकऱ्यांना अधिक पैसे मिळवून देण्यास उपयोग होतो असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

### अवजारांची माहिती

जमिनीमध्ये चांगले पीक येण्यासाठी नांगरणी महत्वाची असते याचाही उल्लेख फेरार यांनी केला आहे.[४] त्यांची माहिती शेतकऱ्यांना नियमितपणे मशिनरी समजावून सांगत असत विलायती नांगर चालवण्यासाठी ६ बैल नांगराना आवश्यक असतात. त्याचप्रमाणे नांगरासाठी अधिक प्रमाणात लोखंडाचा वापर केला जातो. नांगर लोखंडी असल्याने जमिनीत फार खोल जाऊ शकतो त्यामुळे जमिनीच्या पिकासाठी अशा प्रकारची नांगरणी उपयुक्त ठरते म्हणून शेतकऱ्यांनी शेतजमीन नांगरण्यासाठी विलायती नांगराचा अधिक प्रमाणात उपयोग करावा असेही मिशनऱ्यांनी सुचविले आहे.

### शेतीपूरक व्यवसाय

शेतकऱ्याचे अधिक उत्पन्न वाढविण्यासाठी त्यांना पुरक व्यवसाय उपयुक्त ठरतात. त्याबाबतची माहिती फेरार यांनी आपल्या सहकार्यांना दिली आहे.[५] त्यामध्ये विलायती मेंढ्यांचा शेतकऱ्यांना कसा फायदा होऊ शकतो याची माहिती स्पष्ट केली आहे. या मेंढ्याचा उपयोग अनेक कारणासाठी होत असल्याचे स्पष्ट केले आहे. या विलायती मेंढ्याची लोकर (कातडी) चांगल्या प्रकारची असल्याने चांगल्या प्रतीचे लोकरी वस्त्र तयार करण्यासाठी त्याचा उपयोग होऊ शकतो. अशा लोकरीस चांगली किंमत मिळते असेही त्यांनी सुचविले आहे.

### कापसाची मशागत

श्रीमती फेरार यांनी कापसाविषयी ही माहिती दिली आहे. शेतकरी कापसाचे पीक घेतो परंतु पीक तयार झाल्यानंतर कापूस योग्य रितीने काढला जात नाही. त्यामुळे कापसात केरकचरा आणि माती आढळून येते. हा मळकट झालेला कापूस योग्य किंमतीत देवू शकत नाही यासाठी शेतकऱ्यांनी कापूस काढल्यानंतर त्यांची विक्री करण्यापूर्वी तो चांगल्या अवस्थेत राहीला पाहीजे यासाठी त्यांनी आधुनिक तंत्राचा मार्ग स्वीकारने आवश्यक आहे. या कामात मिशनऱ्यांनी पारंपारिक पीके घेण्याऐवजी नव्यातंत्रानी विकसीत झालेली पीके घेतली तर त्याचा आर्थिक लाभ चांगल्याप्रकारे होऊ शकेल असेही सदरच्या पुस्तकात स्पष्ट केले आहे. विशेष म्हणजे त्या काळात महसुलाचे प्रमाण थोडे अधिक होते. त्यासाठी शेतकऱ्यांनी अधिक उत्पन्न मिळविण्यासाठी दुसरी उत्पादनाची साधणे शोधली पाहिजेत असे मिशनऱ्यांनी सुचविले होते.

### शेतीबरोबर औद्योगिक प्रशिक्षण

भारतात परंपरेचे महत्व अधिक आहे. एखाद्या कुटुंबात ठराविक प्रकारचा व्यवसाय असेल तर त्याच्या मुलांनी तोच व्यवसाय करावा असा अलिखीत नियम असल्याचे फेरार बाईंनी नमूद केले आहे परंतु; अशा प्रकारची व्यवस्था तितकिशी चांगली नसल्याचे मिशनऱ्यांनी स्पष्ट केले आहे. समाजात अथवा आर्थिक बाबतीत होणाऱ्या बदलाचा विचार करुन शेतकऱ्यांनी आपल्या मुलांना नवा व्यवसाय करण्यास प्रेरीत केले पाहिजे असे विषद केले होते.[६] म्हणून कोल्हापूर भागात मिशनऱ्यांनी आपल्या खिस्तीबांधवाच्या मुलांना पारंपारीक व्यवसाय न करता त्यांना नव्या तांत्रिक शिक्षणाची ओळख व्हावी त्यासाठी त्यांनी प्रयत्न केले आणि त्यासाठी त्यांनी सांगली येथे इंडस्ट्रीज स्कूलची स्थापना केली. सन १८६१ पासून ही संस्था कोणत्याही जाती अथवा धर्माचा विचार न करता तरुणांना तांत्रिक शिक्षणाचे मार्गदर्शन केले जाते.[७] त्याचा फायदा आतापर्यंत हजारो मुलांनी घेतला आहे.

### शेतकऱ्यांना कर्जाबाबत मार्गदर्शन

वायल्डर यांनी शेतकऱ्यांच्या कर्जाबाबतही उल्लेख केला आहे. शेतकरी दुष्काळामुळे किंवा लग्न कार्यासाठी सावकाराकडून कर्ज घेत असतो अशा कर्जाचे व्याज अधिक असल्याने त्यांची परतफेड करणे शेतकऱ्यास कठीण होते. याबाबत या पुस्तकात म्हटले आहे कि, ''कर्ज काढणे म्हणजे संकट पदरी बांधून घेणे ते पैका सव्वा एक, दीडी, दुप्पट सुध्दा करुन द्याव लागतो तेव्हा कठीण वाटते धनकु आपला पैका परत मागू लागला म्हणजे तो कर्जदारास शत्रू सारखा वाटतो. ऋणी मनुष्य त्या ओझ्याने डोक्यावरच्या ओझ्यासारखा पिडलेला असतो आणि जो ऋण फेडावयाची काळजी करत नाही, लोकांचा पैसा खावून दडवून खुशाल राहतो त्याला तर सावपणा येत नाही. अशी दोहोकडून अडचण आहे ५०/- आज घेतले तर ५० दिवस पदरचे ५०/- आणखी फुक्कट द्यावे लागतात. '' त्यापेक्षा ईश्वराने जितके दिले आहे यात फार सुख आहे. प्रिती करणाच्या ऋणाशिवाय कोणाचा ऋणी होवू नको असे ईश्वराच्या पोतीत म्हटले आहे.[८]

### व्यापारी पिके घेण्याबाबत मार्गदर्शन

मिशनऱ्यानी शेतकऱ्यांना नगदी पिके घेण्याबद्दल सुचविले होते. त्याबाबत श्रीमती फेरार यांनी त्याची सविस्तर माहिती आपल्या पुस्तकात नमुद केली आहे. त्याची प्रेरणा मिशनऱ्यांना सतत झालेचे दिसते. कोल्हापूर येथील मिशनऱ्यांनी कोडोली येथील जमीन मिशन केंद्रसाठी विकत घेतल्यानंतर त्या जमिनीत ऊसाचे पीक घेण्याचा मिशनऱ्यांनी यशस्वी प्रयत्न केला विशेष म्हणजे ही जमीन माळरान होती. मिशनऱ्यांच्यामध्ये गोहीन यांचा आवर्जुन उल्लेख करता येईल. त्यांच्या सुचनेनुसार ही माळरान जमीन प्रथम विलायती नांगराने चांगल्याप्रकारे नांगरण्यात आली. अशक्य असे ऊसाचे बियाणे उपलब्ध करुन त्याची नव्या तंत्राप्रमाणे लागवड करण्यात आली. मिशनऱ्यांनी माळरानावर

ऊसाची लागवड केली ही वार्ता ग्रामीण भागात पसरली. त्यामुळे भागातील शेतकऱ्यांनी ऊसपिकांची पाहणी करण्यासाठी गर्दी केली. त्याची चर्चा कोल्हापूर संस्थानात बऱ्याच ठिकाणी पसरली होती.

### कोल्हापूर येथील कृषी शैक्षणिक केंद्र

छ. शाहू महाराजांनी १९१५ मध्ये मिशनऱ्यांना ३५ एकर जमीन देणगी दिली होती. या जागेमध्ये मिशनऱ्यांनी आयर्विन हायस्कूलची इमारत बांधली.[९] त्याचप्रमाणे काही वर्षानंतर 'कोल्हापूर शेती शाळा' सुरू करण्यात आली. या शेती शाळेची सुरूवात जून १९२६ मध्ये झाली.[१०] या शाळेच्या उभारणीसाठी गोहीन यांचा पुढाकार महत्त्वाचा ठरला. शेती शाळेमध्ये २४ सप्टेंबर १९२६ रोजी कृषी संदर्भात पहिला कार्यक्रम आयोजित केला होता. या प्रसंगी अमेरिकेहून कृषी शिक्षणाबाबत माहिती असणारे काही तज्ञ व्यक्ती उपस्थित होत्या.

किनकेड हे कोल्हापूर येथे मिशनरी असताना त्यांनी कृषी शिक्षणाबाबत आवश्यक ती माहिती प्रथम गोळा केली होती. त्यांच्या आधारावर सदर कृषी शाळेत उभारणी झाली होती. या कार्यक्रमाच्या प्रसंगी कृषीबाबत अमेरिकेत होत असलेल्या नवीन प्रयोगाबाबतची माहिती दिली. यावेळी पुणे येथील कृषी महाविद्यालयाचे प्राध्यापकही उपस्थित होते. कृषीबाबत आवश्यक अशी माहिती उपलब्ध करून दिली जाणार असल्याने काही शेतकरी बांधवही उपस्थित होते.

कोल्हापूर येथील कृषी शाळेची प्रगती चांगल्यारितीने होऊ शकली; कारण या शाळेस गोहीन यांचे मार्गदर्शन लाभले होते. त्याप्रमाणे शेतीच्या संदर्भात आवश्यक असे सर्व ज्ञान उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न झाला होता. तसेच शेतीबाबत प्रात्यक्षिक करण्यासाठी विपुल प्रमाणात जमीन उपयुक्त होती. या शेतीमध्ये भात, ज्वारी, भुईमुग, मिरची यासारखी पिके घेतली जात असत. या पिकांचे शास्त्रावर आधारित संवर्धन केले जात असल्याने उत्पादन चांगल्याप्रकारे मिळत असे. हा कृषी शाळेचा प्रयत्न प्रायोगिक स्वरूपात असला तरी सभोवतालचे शेतकरी येतील पिकांची माहिती घेण्यासाठी येत असत आणि त्यांना आवश्यक असे मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाई.

मिशनऱ्यांच्या कृषी शाळेचा चांगला परिणाम कोल्हापूर दरबारावरही झाला. अनेक प्रसंगी दरबाराकडून सदर शाळेबाबत आवश्यक ती माहिती प्राप्त केली जात असे. या शाळेतील पहिल्या वर्षाचा निकाल ८० टक्के लागला होता.[११] त्याबाबतची माहितीही कोल्हापूर संस्थानात सर्वत्र पसरली होती. विशेष म्हणजे शाहू महाराजांप्रमाणेच त्यांचे पुत्र राजाराम महाराज यांनाही शेतीबाबत आवड होती. कोल्हापूर येथील शाळेत शेतीबाबत होणाऱ्या नवीन प्रयोगाबाबत त्यांनी मिशनऱ्यांचे कौतुक केले होते.

### निष्कर्ष :

मिशनऱ्यांना शेतकरी वर्गातील अज्ञान आणि बुरसटलेली जुनी विचार सरणी नाहीशी करावयाची होती. यासाठी त्यांनी सातत्याने नव्या प्रयोगांचा अवलंब केला. यासाठी शेती क्षेत्रात महत्वपूर्ण बदल झाल्याशिवाय आणि शेतकऱ्यांना पुरेशे उत्पन्न मिळाल्याशिवाय त्यांची परिस्थिती सुधारणार नाही अशाप्रकारचा विश्वास २०० वर्षापूर्वीच मिशनऱ्यांनी अभ्यासाव्दारे स्पष्ट केले होते. शेतकऱ्यांचे प्रश्न समाधानकारक सुटल्या शिवाय देशाची प्रगती होणार नाही. याकडे त्यांचे विशेष लक्ष होते. याबाबत शेतकऱ्यांविषय त्यांनी स्वीकरलेले विधायक दृष्टीकोन आजच्या काळातही महत्वाचा आहे, असे म्हणता येईल.

### तळटीपा

१. फेरार (श्रीमती), अनुवाद डॉ.आनंद देशमुख, यात्रेकरूंचा वृत्तांत, २००४, पान नं. २८
२. कित्ता पृ. ३८
३. कित्ता पृ. ५६
४. कित्ता पृ. ५३
५. कित्ता पृ. १०
६. कित्ता पृ. १०
७. WIN - Volume No. 7, November 1925, No.5, Page No. 5
८. फेरार (श्रीमती), अनुवाद डह.आनंद देशमुख, यात्रेकरूंचा वृत्तांत, २००४, पान नं. ४७
९. जनरल फाईल नं. २६४, कोल्हापूर पुराभिलेखागार, कोल्हापूर.
१०. WIN - Volume No. 8, December 1926, No.5, Page No. 10
११. WIN - Volume No. 8, December 1926, No.5, Page No. 11

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database



Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-
413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com